मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### महापौर वंदना मगरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा; पायाभूत सुविधांवर भर

# जालना मनपाचा ४६८ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर; विकासकामांना मोठी चालना

### फुगवलेल्या आकड्यांवरून विरोधकांचा हल्लाबोल; पारदर्शकतेच्या मुद्द्यावर जालना मनपा सभागृह तापले

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय विशेष सभा आज दि. ३० मार्च २०२६ रोजी मनपा कार्यालयातील नवीन सभागृहात दुपारी ३ वाजता पार पडली. या सभेत आर्थिक वर्ष २०२६२०२७ साठीचा ४६८ कोटी २ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला असून, सभेने त्यास मंजुरी दिली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

जालना महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत आज विरोधकांनी सत्ताधारी व प्रशासनावर जोरदार हल्लाबोल चढवत सभागृहातील वातावरण चांगलेच तापवले. अर्थसंकल्पातील 'फुगवलेल्या' आकड्यांपासून ते पत्रकारांना प्रवेश नाकारण्याच्या मुद्द्यापर्यंत अनेक विषयांवर विरोधकांनी तीव्र टीका केली. विरोधकांनी प्रशासनावर टीका करत, ''अर्थसंकल्प हा शहराच्या विकासाचा आराखडा असतो. मात्र तो वास्तवावर आधारित नसून केवळ कागदी आकड्यांवर उभा असेल, तर तो जनतेची दिशाभूल करणारा ठरेल,'' असे मत व्यक्त केले. उत्पन्नाचे वास्तववादी अंदाज मांडून पारदर्शकता राखावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. या विशेष सभेला शहराच्या पहिल्या महिला महापौर वंदना मगरे यांनी अध्यक्षस्थान भूषवले, तर उपमहापौर राजेश राऊत उपस्थित होते. जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त आशिमा मित्तल यांनी प्रशासकीय बाजू सांभाळली. याशिवाय सर्व नगरसेवक, अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त, सहायक आयुक्त, विभागप्रमुख, नगरसचिव आणि मनपाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अर्थसंकल्प सादरीकरण**

स्थायी समितीचे सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत पांगारकर यांनी सभागृहात अंदाजपत्रक सादर केले. या अर्थसंकल्पात उत्पन्न आणि खर्चाची बाजू समतोल ठेवत शहराच्या विकासासाठी विविध योजनांची तरतूद करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

एकूण आर्थिक चित्र

एकूण उत्पन्न: ₹४६८,०२,४७,३००

एकूण खर्च: ₹४६८,०२,४७,३००

वर्षाअखेरीस अपेक्षित शिल्लक: ₹३.५ लाख

उत्पन्नाचे प्रमुख स्रोत

महानगरपालिका दर व कर: ₹८४.५२ कोटी

मालमत्ता कर: ₹४३ कोटी

पाणीपट्टी कर: ₹२२.३५ कोटी





महसुली अनुदान (शासन): ₹११५.७८ कोटी

भांडवली कामांसाठी शासन अनुदान: ₹२४२.०८ कोटी

नियोजित खर्चाचे स्वरूप

सामान्य प्रशासन: ₹१०७.७० कोटी

आरोग्य व स्वच्छता: ₹३२.३९ कोटी

पाणीपुरवठा व मलनिस्सारण: ₹१०.०३ कोटी

सार्वजनिक सुरक्षितता (अग्निशमन/विद्युत): ₹८.३० कोटी

शिक्षण व वाचनालय: ₹७४.३० लाख

विकासकामांवर विशेष भर

या अर्थसंकल्पात भांडवली खर्चासाठी तब्बल ₹३०८.८१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये रस्ते विकास, पाणीपुरवठा योजना, मलनिस्सारण प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

विशेष बाब म्हणजे, अग्निशमन करातून ₹१६ कोटी उत्पन्नाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, ही मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ आहे.

नियमावलीनुसार तयार अर्थसंकल्प

हा अर्थसंकल्प महानगरपालिका नियमावली ९५, ९६(१) आणि १०० नुसार तयार करण्यात आला असून, आर्थिक शिस्त आणि नियोजनावर भर देण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

शहराच्या विकासाचा रोडमॅप

या अर्थसंकल्पातून जालना शहराच्या पुढील वर्षातील विकासाचा आराखडा स्पष्ट होत असून, पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य आणि महसूल वाढ यावर भर देण्यात आला आहे.

तथापि, काही नगरसेवकांकडून उत्पन्नाच्या अंदाजांबाबत शंका व्यक्त करण्यात येत असल्याने, येत्या काळात या अर्थसंकल्पावर अधिक चर्चा होण्याची शक्यता आहे.

एकंदरीत, जालना महानगरपालिकेचा २०२६२७ चा अर्थसंकल्प हा विकासाभिमुख असल्याचे चित्र समोर आले असले, तरी त्यातील आकडेवारीची अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष कामांची गती यावरच शहराच्या प्रगतीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## फुगवलेल्या आकड्यांचा अर्थसंकल्प; उत्पन्नाचा अंदाज 'अवास्तव'; नगरसेवक अश्विन अंबेकरांचा आरोप

### स्मशानभूमी, खेळाचे मैदान व उद्यानांसाठी तरतुदीची जोरदार मागणी; मनपा सभागृहात चर्चा तापली

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत आज आकडेवारीच्या पारदर्शकतेवरून जोरदार चर्चा रंगली. नगरसेवक अश्विन अंबेकर यांनी अर्थसंकल्पातील उत्पन्नाचे आकडे 'फुगवून' दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप करत प्रशासनाला थेट लक्ष्य केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

अंबेकर म्हणाले की, ''मागील तीन वर्षांपासून दर व करांमधून महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न सरासरी १४ ते १५ कोटी रुपयांच्या दरम्यान आहे. मात्र, यंदाच्या अर्थसंकल्पात हेच उत्पन्न तब्बल ८४ कोटी रुपये गृहीत धरण्यात आले आहे. ही आकडेवारी वास्तवाशी विसंगत असून ती फुगवून दाखवण्यात आली आहे.'' त्यांनी पुढे नमूद केले की, केवळ कर उत्पन्नच नव्हे, तर इतर अनेक महसुली घटकांमध्येही अशाच प्रकारे अवास्तव वाढ दाखवण्यात आल्याचे दिसून येते.

'विकासाचा आराखडा की केवळ कागदी घोडे?'

अंबेकर यांनी प्रशासनावर टीका करत, ''अर्थसंकल्प हा शहराच्या विकासाचा आराखडा असतो; मात्र तो वास्तवावर आधारित नसून कागदी आकड्यांवर उभा असेल, तर तो जनतेला दिशाभूल करणारा ठरतो,'' असे स्पष्ट केले. त्यांनी प्रशासनाला उत्पन्नाचे वास्तववादी अंदाज सादर करण्याचे आवाहन केले.

मूलभूत सुविधांकडे दुर्लक्षाचा आरोप

अर्थसंकल्पातील आकडेवारीवर टीका करताना अंबेकर यांनी शहरातील मूलभूत सुविधांच्या अभावाचाही मुद्दा ठळकपणे मांडला. कन्हैयानगर, नूतनवसाहत आणि चंदनझिरा या भागांमध्ये स्मशानभूमीची सुविधा नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

''मृत्यूसारख्या संवेदनशील प्रसंगीही नागरिकांना लांब अंतरावर जावे लागते, ही अत्यंत गंभीर बाब आहे. या भागांसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची तरतूद तातडीने करण्यात यावी,'' अशी मागणी त्यांनी केली.



नवीन जालना भागासाठी खेळाचे मैदान व उद्यानाची गरज

याशिवाय, वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर नवीन जालना भागात मुलांसाठी खेळाचे मैदान व नागरिकांसाठी उद्यानांची कमतरता असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. ''शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ रस्ते व इमारती पुरेशा नाहीत; नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनासाठी खुल्या जागा, खेळाची मैदाने आणि उद्याने अत्यावश्यक आहेत,'' असे ते म्हणाले. यासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूद करण्याची त्यांनी मागणी केली.

सभागृहात मिश्र प्रतिक्रिया

अंबेकर यांच्या या मुद्द्यांवर काही नगरसेवकांनी समर्थन दर्शवले, तर काहींनी प्रशासनाच्या भूमिकेचे समर्थन केले. तथापि, उत्पन्नाच्या अंदाजातील मोठ्या तफावतीमुळे सभागृहात चर्चा चांगलीच रंगली.

प्रशासनाकडून स्पष्टीकरण अपेक्षित

या सर्व पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाकडून उत्पन्नाच्या वाढीव अंदाजाबाबत सविस्तर स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे. तसेच, शहरातील मूलभूत सुविधांसाठी आवश्यक तरतुदींचा समावेश करून सुधारित अर्थसंकल्प सादर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जालना मनपात वातावरण तापले

## पत्रकारांना सभागृहात प्रवेश द्या

### नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले आक्रमक

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका (मनपा) सभागृहात पत्रकारांना प्रवेश देण्याच्या मागणीवरून आज मोठा गदारोळ पाहायला मिळाला. नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत सभागृहात जोरदार आवाज उठवला. त्यांच्या या भूमिकेमुळे काही काळ सभागृहातील वातावरण तणावपूर्ण झाले.

मनपाच्या बैठकीदरम्यान शहराच्या विविध प्रश्नांवर चर्चा होत असताना, पत्रकारांना सभागृहात प्रवेश नाकारला जात असल्याचा मुद्दा काठोठीवाले यांनी उपस्थित केला. ''जनतेचे प्रतिनिधी सभागृहात कोणते प्रश्न मांडतात, कोणत्या विषयांवर चर्चा होते आणि प्रशासनावर कोणते प्रश्न उपस्थित होतात, हे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. पत्रकारांशिवाय ही पारदर्शकता शक्य नाही,'' असे ते म्हणाले.



यावेळी त्यांनी प्रशासनावर टीका करत, ''महानगरपालिका म्हणजे 'आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं' अशी परिस्थिती होऊ देणार नाही. जनतेला सभागृहातील प्रत्येक घडामोड समजली पाहिजे, यासाठी पत्रकारांना थेट प्रवेश देणे गरजेचे आहे,'' असे स्पष्ट शब्दांत सांगितले.

**सभागृहात तणाव** काठोठीवाले यांच्या आक्रमक भूमिकेमुळे काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. काही नगरसेवकांनी त्यांच्या मागणीला पाठिंबा दिला, तर काहींनी विद्यमान नियमांचे समर्थन केले. प्रशासनाकडून सुरक्षा आणि शिस्तीचे कारण पुढे करत पत्रकारांना मर्यादित प्रवेश देण्याची भूमिका मांडण्यात आली असल्याची चर्चा होती.

या वादात नगरसेवक अक्षय गोरट्याल यांनी मध्यस्थी करत पत्रकारांसाठी सभागृहाच्या वरच्या गॅलरीत बसण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे सांगितले. ''पत्रकारांना माहिती मिळावी यासाठी व्यवस्था आहे, मात्र थेट सभागृहात प्रवेश देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही,'' असे त्यांनी नमूद केले. तरीही काठोठीवाले यांनी हा पर्याय अपुरा असल्याचे सांगत थेट प्रवेशावर ठाम भूमिका कायम ठेवली.

या संपूर्ण प्रकरणामुळे पत्रकारांच्या भूमिकेवर पुन्हा एकदा चर्चा रंगली. पत्रकार हे लोकशाहीतील चौथा स्तंभ असून, ते प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या कामकाजावर लक्ष ठेवून जनतेपर्यंत माहिती पोहोचवतात. त्यामुळे त्यांना सभागृहात प्रवेश नाकारणे म्हणजे पारदर्शकतेवर मर्यादा आणण्यासारखे असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त करण्यात आले.

या मुद्द्यावर अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नसून, पुढील बैठकीत यावर अधिकृत निर्णय घेतला जाईल अशी शक्यता व्यक्त होत आहे. मात्र, या घटनेमुळे जालना मनपाच्या कामकाजातील पारदर्शकता, नियम आणि पत्रकारांचे अधिकार या तिन्ही मुद्द्यांवर व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

## जालना विधानसभा निवडणुकीत खोतकर यांच्या विजयाला गोरंट्याल यांनी दिलेले आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळले

**जालना । प्रतिनिधी -** २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेचे अर्जुन खोतकर तब्बल १,०४,००० मते मिळवून विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेसच्या कैलास गोरंट्याल यांचा ३१,००० मतांनी पराभव केला होता.

खोतकर यांच्या निवडणुकीला कैलास गोरंट्याल यांनी मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.



याचिकेतले मुद्दे:-

जालना बाजार समितीचे मुख्य प्रशासक हे खोतकर हे लाभाचे पद धारण करीत असल्याने ते विधानसभा निवडणूक लढवण्यास अपात्र आहेत;

खोतकर यांनी नामनिर्देशन पत्रासोबत दाखल केलेले शपथपत्र विहित नमुन्यात नव्हते;

निवडणूक आयोगाने नियमांचे उल्लंघन करून निवडणूक घेतली ज्याने खोतकर यांना फायदा झाला;

या कारणांमुळे खोतकर यांची निवडणूक अवैध असून त्यांची आमदारकी रद्द करावी अशी विनंती गोरंट्याल यांनी मा. उच्च न्यायालयात केली होती.

या याचिकेत खोतकर यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज करून गोरंट्याल यांनी उपस्थित केलेल्या एकाही मुद्द्यात तथ्य नाही त्यामुळे त्यांची याचिका प्राथमिक टप्प्यावर च रद्द करावी अशी विनंती मा. न्यायालयास केली होती. आपल्या अर्जात खोतकर यांनी खालील मुद्दे मांडले होते:-

बाजार समिती ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने तीत धारण केलेले कुठलेही पद हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९१ नुसार लाभाच्या पदाच्या व्याख्येत येत नाही;

खोतकर यांची बाजू मांडताना जेष्ठ वकील संजीव देशपांडे यांनी संविधान सभेतील चर्चेचा आधार घेत न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की एखाद्या व्यक्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेतील धारण केलेले पद हे त्या व्यक्तीस विधानसभा निवडणूक लढविण्यास अपात्र करत नाही. अशी अपात्रता केवळ राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी असते.

तसेच खोतकर यांचे नामनिर्देशन पत्रासोबतचे शपथपत्र विहित नमुन्यात असून त्यांनी संपूर्ण माहिती जनतेला दिलेली आहे;

निवडणूक आयोगावर गोरंट्याल यांनी केलेले आरोप निराधार व बिनबुडाचे असून त्यांच्या पुष्ट्यर्थ त्यांनी एकही पुरावा दिलेला नाही.

मा. उच्च न्यायालयाने सुनावणीअंती खोतकर यांचा अर्ज मंजूर करून गोरंट्याल यांची याचिका फेटाळून लावली.

खोतकर यांचे तर्फे जेष्ठ वकील संजीव देशपांडे यांनी बाजू मांडली व त्यांना ॲड. सुबोध शाह व ॲड प्रतीक भोसले यांनी सहकार्य केले.

### गोरंट्याल पुन्हा उघडे पडले

आमदार अर्जुन खोतकर यांच्या विरोधात कायम संशयाचे वातावरण तयार करणे आणि बदनामी करणे यावरच माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा भर राहिला आहे. न्यायालयाच्या या निकालामुळे दुसऱ्यांदा कैलास गोरंट्याल उघडे पडले आहेत. यापूर्वीही त्यांनी उशिरा अर्ज दाखल केल्याचा आरोप केला होता. परंतु त्या प्रकरणातही आ.अर्जुन खोतकर निर्दोष ठरले होते. सत्य कधीच लपत नसते. यापुढे तरी खोटे आरोप आणि अपप्रचार करू नये, एवढाच न्यायालयाच्या निकालाचा अर्थ विरोधकांनी घेतला तरी पुरेसा आहे.

संपादकीय पान

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग संयम, प्रेम करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## वैद्यकीय शिक्षणातील मूल्यमापन पद्धतीत नवे बदल आवश्यक

पल्स २०२६ मधील चर्चासत्रात भर

**मुंबई -** ''असेसमेंट इनोव्हेशन : मल्टिपल चॉईसच्या पलीकडे'' या विषयावर पल्स २०२६ अंतर्गत जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी तज्ज्ञांनी पारंपरिक मल्टिपल चॉईस (एमसीक्यू) परीक्षांपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची गरज अधोरेखित केली. केवळ सैद्धांतिक ज्ञानावर आधारित परीक्षा पुरेशा नसून, प्रत्यक्ष परिस्थितीत निर्णयक्षमता, संवाद कौशल्य, तणावात काम करण्याची क्षमता आणि रुग्णांशी वागण्याची पद्धत यांचेही मूल्यमापन आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.
या चर्चासत्रात ग्रँड मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अजय रंधारवर, डॉ गौतम खन्ना, मेट्रोपोलिस फौंडेशनच्या अध्यक्ष, डॉ. दुरू शाह, उत्तर प्रदेशच्या केजिएम्यू च्या वैद्यकीय शिक्षण विभाग प्रमुख आणि नर्सिंग च्या अधिष्ठाता डॉ. अमिता पांडे आणि ग्लोबल ऐंग्जेमेंट अँड एज्युकेशन युनिव्हर्सिटी ऑफ लीड्सचे प्रा. डॉ. पृथ्वी सुकुमार यांनी सहभाग घेतला.
चर्चेत ओएससीई, सिम्युलेशन-आधारित प्रशिक्षण, डिजिटल साधने आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन या पद्धतींचा वापर वाढवण्यावर भर देण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष कामासाठी तयारी अधिक सक्षम होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.
तसेच, भारतात कॉम्पिटन्सी बेस्ड मेडिकल एज्युकेशन (सीबीएमई) सुरू झाल्यानंतर काही सकारात्मक बदल झाले असले तरी त्याची अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे प्रभावीपणे झालेली नसल्याचे नमूद करण्यात आले. विशेषतः शिक्षण आणि मूल्यमापन यामधील विसंगती दूर करण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली.
डिजिटल लॉगबुक, राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नसंच, प्रशिक्षित परीक्षक आणि प्रादेशिक मूल्यमापन केंद्रे उभारण्याचे सुचविण्यात आले. यामुळे देशभरात एकसमान आणि विश्वासार्ह मूल्यमापन प्रणाली विकसित होऊ शकते, असे मत मांडण्यात आले.
या चर्चासत्रातून वैद्यकीय शिक्षण अधिक व्यावहारिक, पारदर्शक आणि रुग्णकेंद्री करण्यासाठी मूल्यमापन पद्धतीत व्यापक सुधारणा आवश्यक असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यशाचे कौतुक करत दिल्या शुभेच्छा

# आशिया चषक तिरंदाजी स्पर्धेत तेजल साळवेने पटकावली दोन पदके

## जिल्हा प्रशासनाकडून पाठीवर कौतुकाची थाप




**जालना । प्रतिनिधी -** एशिया कप वर्ल्ड रँकिंग आर्चरी (स्टेज-१) स्पर्धेत तेजल साळवेने मिळवलेले हे यश केवळ तिचे वैयक्तिक यश नसून संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. तिची मेहनत, शिस्त आणि जिद्द आजच्या उदयोन्मुख खेळाडूंसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील प्रत्येक गुणवंत खेळाडू आणि विद्यार्थ्याला सहकार्य करण्यास कटिबद्ध आहे, असे गौरवोद्गार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी काढले.

बँकॉक (थायलंड) येथे संपन्न झालेल्या एशिया कप वर्ल्ड रँकिंग आर्चरी (स्टेज-१) स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत जालन्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणाऱ्या तेजल राजेंद्र साळवे हिचा आज जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. तेजलने या प्रतिष्ठित स्पर्धेत आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत वैयक्तिक कंपाउंड प्रकारात कांस्यपदक आणि भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना रौप्यपदक अशी दोन पदके पटकावली आहेत. तिच्या या कामगिरीमुळे जागतिक तिरंदाजी क्रमवारीत जिल्ह्याची आणि देशाची मान अभिमानाने उंचावली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तेजलच्या यशाचे कौतुक करत तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच भेटीदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी तेजलचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी तेजलसोबत तिचे वडील राजेंद्र साळवे आणि तिचे मार्गदर्शक आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रकाश दुसेजा उपस्थित होते.

यावेळी बोलताना तेजलने जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रशासनाच्या प्रोत्साहनामुळेच मला आंतरराष्ट्रीय स्तरावर निश्चिंतपणे खेळता आले आणि हे यश संपादन करता आले, अशा भावना तिने व्यक्त केल्या. तसेच आगामी स्पर्धांमध्येही अशीच कामगिरी करून देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचा मानस तेजलने यावेळी बोलून दाखवला.

## जिल्हाधिकारी यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीचा उल्लंघन केल्यामुळे टेंडर रद्द करा - प्रकाश सोळंके

**परतुर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातील चांगतपुरी येथील वाळू घाटावर सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतुकीबाबत आज उपविभागीय अधिकारी, परतुर यांना निवेदन देऊन तक्रार करण्यात आली. मनसे जिल्हाध्यक्ष जालना प्रकाश सोळंके यांनी हे निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केल्यानुसार, सदर वाळू घाटावर शासनाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे उघड उल्लंघन होत असून, ३ पोकलेन व जेसीबीसारख्या यंत्रांच्या सहाय्याने रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. तसेच २७ पेक्षा अधिक हायवा वाहनांद्वारे अवैध वाहतूक केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. याशिवाय, वाळू रॉयल्टीच्या एका पावतीवर एकाच वाहनाऐवजी तीन ते पाच हायवा वाहनांकडून वारंवार ट्रिप्स करून पावत्यांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नदीपात्रात खोल खड्डे करून पर्यावरणीय समतोल बिघडवला जात असून, याचा परिणाम परिसरातील शेती, भूजल पातळी व नैसर्गिक प्रवाहावर होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच इतक्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू असतानाही महसूल प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत असल्याचेही नमूद करण्यात आले. या प्रकरणात स्थानिक स्तरावरील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताची शक्यता व्यक्त करत सखोल व निष्पक्ष चौकशीची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित वाळू घाटाचा टेंडर तात्काळ रद्द करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, उपविभागीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तात्काळ कारवाई करावी, बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतूक बंद करावी, यंत्रसामग्री जप्त करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## वाल्मीक नगर मारहाण प्रकरणाला धर्मांतराचा रंग? नागरिकांचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक ३० सोमवार रोजी दुपारी दोन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील वाल्मीक नगर ख्रिस्ती कॅम्प परिसरात झालेल्या मारहाण प्रकरणाला आता वेगळेच वळण लागल्याचे समोर येत आहे. पालम संडे निमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान दोन गटांमध्ये तुंबळ हाणामारी झाली होती. या घटनेत दोन्ही गटातील काही युवक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर वाल्मीक नगर येथील काही नागरिकांनी गंभीर आरोप करत प्रकरणाला नवे स्वरूप दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ख्रिस्ती कॅम्प परिसरात वारंवार धर्मांतराचे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि वाल्मीक समाजातील नागरिक व तरुणांवर धर्मांतरासाठी दबाव टाकला जातो. तसेच महिलांनाही यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पालम संडे निमित्त आयोजित सार्वजनिक जेवणाच्या कार्यक्रमादरम्यानच हा वाद उफाळून आला आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. जखमींपैकी वाल्मीक समाजातील काहींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वाल्मीक नगरमध्ये ये-जा करण्यासाठी ख्रिस्ती कॅम्प परिसरातून जावे लागते. त्या ठिकाणी वारंवार कार्यक्रम होत असल्याने अनेक वेळा वाद निर्माण होतात, असा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झाला नसून पोलिसांकडून तपास झाल्यास मारहाणीमागील नेमके कारण आणि धर्मांतराच्या आरोपांची सत्यता काय आहे ही ऊघड होईल.

# जालन्यातील चंदनझीरा येथे मॅपिंगला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## एका दिवसात ५०० हून अधिक नोंदी

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक ३० सोमवार रोजी दुपारी ४ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील चंदनझीरा परिसरातील महात्मा फुले चौक येथे दि.३० सोमवार रोजी मॅपिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पला चंदनझीरा, सुंदर नगर तसेच नॅशनल नगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.
महाराष्ट्रभर सुरू असलेल्या मॅपिंग मोहिमेअंतर्गत जालना महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये हा कॅम्प घेण्यात आला. पर्यवेक्षक राहुल मुंडे यांच्या विशेष पुढाकारातून आयोजित या उपक्रमाला प्रभागातील चार ही नगरसेवकांनी सहकार्य केले.
या कॅम्पमध्ये मोठ्या प्रमाणावर यांनी सहभाग नोंदवला असून या कम्प मध्ये सुमारे ५०० ते ६०० पर्यंत नागरिकांनी आपले मॅपिंग पूर्ण केले असल्याची माहिती राहुल मुंडे यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की, चंदनझीरा, सुंदर नगर आणि नॅशनल नगर या भागात आतापर्यंत जवळपास ६० टक्क्यांपर्यंत नागरिकांचे मॅपिंग पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे.
दरम्यान, नगरसेविका रुबिना पठाण यांचे पती सामाजिक कार्यकर्ते माजेद खान यांनी सांगितले की, येत्या दोन ते तीन दिवसांत एकता चौक परिसरातही अशाच प्रकारचा कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



जागतिक ग्राहक हक्क दिन कार्यक्रम

# ग्राहकांनी खरेदी करतेवेळी सुरक्षेबाबत तडजोड करू नये - न्यायमूर्ती अपर्णा काटे

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या स्पर्धात्मक आणि डिजिटल युगात ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे कोणतेही उत्पादन खरेदी करताना पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार प्रत्येक नागरिकाला उत्पादनापासून सुरक्षा मिळविण्याचा हक्क आहे. तरी सध्याच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत ग्राहकांनी आपल्या सुरक्षेच्या मागणीशी कोणतीही तडजोड करू नये, असे प्रतिपादन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा न्यायमूर्ती अपर्णा काटे यांनी केले.

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुरवठा विभागाच्या वतीने जेईएस महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, तहसीलदार छाया पवार, प्राचार्य अग्निहोत्री यांच्यासह ग्राहक पंचायतीचे अशासकीय सदस्य उपस्थित होते.

न्यायमूर्ती काटे म्हणाल्या की, ग्राहक संरक्षण कायद्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठे कवच उपलब्ध करून दिले आहे. एखादे उत्पादन सदोष असेल किंवा त्यामुळे ग्राहकाच्या जीविताला धोका निर्माण होत असेल, तर त्याविरुद्ध आवाज उठवण्याचा आणि कायदेशीर सुरक्षा मिळवण्याचा पूर्ण अधिकार ग्राहकाला आहे. एखादे उत्पादन केवळ स्वस्त मिळते म्हणून सुरक्षेशी तडजोड करणे भविष्यात महाग पडू शकते, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

ग्राहकांनी आपली ताकद ओळखावी. ग्राहक संरक्षण कायदा तुम्हाला दाद मागण्याचा अधिकार देतो. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सध्या आपण ऑनलाईन व बाजारात जावून थेट अशा दोन प्रकारे खरेदी करतो. डिजीटल मार्केटप्लेस यांची नोंदणी आवश्यक आहे. तसेच पोर्टलवर कार्यालयाची माहिती तसेच विक्रेत्यासाठी कडक नियमावली आहे. असे सांगून त्यांनी ग्राहक न्याय आणि हक्क या विषयावर प्रकाश टाकला.

अपर जिल्हाधिकारी मिसाळ म्हणाले की, ग्राहकांनी आपले हक्क व अधिकाराप्रती जागरुक असणे आवश्यक आहे. यांनी बाजारपेठेतून साहित्य खरेदी करतांना सावधानता बाळगणे गरजेचे आहे. उत्पादनाची गुणवत्ता व प्रमाणता तपासणी अधिक महत्वाचे आहे. ग्राहकाला आपली फसवणूक झाली आहे असे समजल्यास तो जिल्हा ग्राहक फोरमकडे तक्रार मांडू शकतो. जर तिथे समाधान झाले नाही तर आपण राज्य ग्राहक फोरमकडे दाद मागू शकतो. त्यासाठी कोणत्याही खरेदीनंतर अधिकृत पक्के बिल घेण्याचा आग्रह धरा, जेणेकरून भविष्यात तक्रार करणे सुकर होईल. असेही त्यांनी सांगितले.




सायबर विभागाचे पोलिस उपनिरीक्षक योगेश चव्हाण म्हणाले की, सध्या सोशल मीडियाचा प्रचंड वापर वाढलेला आहे तरी अनोळखी व्यक्तीशी मैत्री करणे टाळावे. तसेच सोशल मीडियाच्या पुर्णतः आहारी जावू नये. एपीके फाईलमुळे एखाद्या मोबाईलवर ताबा सहज शक्य आहे त्यामुळे अशा प्रकारच्या एपीके फाईल्स आपल्या व्हॉटसअपवर आल्यानंतर त्या डाऊनलोड करणे टाळावे. ऑनलाईन व्यवहारात होणारी सायबर फसवणूक टाळण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, बँकेचे व्यवहार आणि मोबाईलचे व्हॉटस्पॉट कोणाशीही शेअर करू नका. तसेच प्लेस्टोअरशिवाय इतर ठिकाणावरुन कोणतेही ॲप्लीकेशन डाऊनलोड करणे बंद करावेत. तसेच सायबर गुन्हा घडल्यास त्यांची नोंदणी तात्काळ .. या संकेतस्थळावर करावी. असेही त्यांनी सांगितले.

यावेळी तहसीलदार छाया पवार आणि प्राचार्य अग्निहोत्री यांची समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमास विद्यार्थी, नागरिक, शिक्षक आदि उपस्थित होते.

# केबिन वाटपावरून जालना मनपात राजकीय खळबळ; विरोधी पक्षनेत्यावर अन्यायाचा आरोप

## भाजपच्या गटनेत्यासह चार सभापतींना केबिन; शिवसेना पदाधिकाऱ्यांना वंचित ठेवल्याने संताप

**जालना | प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेत सभापती व पदाधिकाऱ्यांच्या केबिन वाटपावरून नव्या वादाला तोंड फुटले असून, सत्ताधारी भाजप आणि विरोधी शिवसेना आमनेसामने आल्याचे चित्र आहे. सत्ताधारी गटातील पदाधिकाऱ्यांना केबिन देण्यात आल्याने, विरोधी पक्षनेत्याला मात्र अद्याप केबिन न मिळाल्यामुळे 'पक्षपातीपणा' झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.



**केबिनसाठी संघर्ष; अखेर काहींना दिलासा**

महानगरपालिकेत काही दिवसांपासून नव्याने निवड झालेल्या सभापतींना स्वतंत्र केबिन मिळावी, यासाठी मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी पुढाकार घेत सत्ताधारी गटातील काही पदाधिकाऱ्यांना केबिन उपलब्ध करून दिल्या.

केबिन मिळालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर, भाजपचे गटनेते महेश निकम, शिक्षण व विद्युत सभापती भाग्यश्री जोगदंड, बांधकाम सभापती माया मनोज जोशी, पाणीपुरवठा सभापती पूनम राज स्वामी, यांचा समावेश आहे.

**शिवसेना पदाधिकारी वंचित; नाराजी तीव्र**

मात्र, शिवसेनेचे विरोधी पक्षनेते कमलेश खैरे आणि गटनेते दीपक राठोड यांना अद्याप केबिन देण्यात आलेली नसल्याने विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे.

''विरोधी पक्षनेत्याला केबिन न देणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. सत्ताधाऱ्यांना प्राधान्य देत विरोधकांना डावलले जात आहे,'' असा आरोप शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**आंदोलनाचा इशारा; वातावरण तापले**

केबिन मिळाली नाही, तर आंदोलन छेडण्याचा इशारा विरोधी पक्षनेते कमलेश खैरे यांनी दिला आहे. या इशाऱ्यामुळे मनपातील वातावरण अधिकच तापले असून, आगामी बैठकीत हा मुद्दा पुन्हा गाजण्याची शक्यता आहे.

**प्रशासनावर वाढता दबाव**

या प्रकरणामुळे महानगरपालिका प्रशासनावर दबाव वाढला आहे. उर्वरित पदाधिकाऱ्यांनाही केबिन देण्याची मागणी जोर धरत असून, प्रशासनाने यावर लवकर निर्णय न घेतल्यास वाद अधिक चिघळण्याची शक्यता आहे.

**अर्जुन गिराम यांच्यासमोर आव्हान**

या संपूर्ण प्रकरणामुळे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांच्यासमोर संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघांनाही समाधानकारक तोडगा काढणे प्रशासनासाठी गरजेचे ठरणार आहे.

**राजकीय संघर्ष तीव्र होण्याची शक्यता**

केबिन वाटपाचा हा मुद्दा केवळ जागेपुरता मर्यादित न राहता, मनपातील सत्ताधारी-विरोधक संघर्षाचा केंद्रबिंदू ठरत आहे. येत्या काही दिवसांत या वादावर तोडगा न निघाल्यास, आंदोलन आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. एकंदरीत, जालना महानगरपालिकेतील केबिन वाटपाचा वाद हा प्रशासनाच्या पारदर्शकतेवर आणि राजकीय समतोलावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत असून, आता सर्वांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे.




**जालना शहर महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांना विधानसभा अध्यक्ष दिनकर घेवंदे यांनी निवेदन देत विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांना स्वतंत्र कॅबिन देण्याची मागणी केली. यावेळी नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, विरोधी पक्षनेते कमलेश खरे उपस्थित होते.**

### काल्याच्या प्रसादाने सप्ताहाची सांगता

# टेंभुर्णीतील राम जन्मोत्सवाला ४८ वर्षाची परंपरा

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** रामनवमीच्या निमित्ताने येथील श्रीराम मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शुक्रवारी काल्याच्या कीर्तनाने झाली. सात दिवस सुरू असलेल्या या खंड हरिनाम सप्ताह मध्ये मोठ्या प्रमाणे भाविकांनी सहभाग नोंदविला दरम्यान गुरुवारी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती प्रभू रामचंद्र लक्ष्मण व सीता यांच्या मुर्त्यांनाही सजावट केली होती. सायंकाळी पाच वाजता गावातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. दरम्यान शुक्रवारी सकाळी बाळासाहेब नाईक महाराज यांचे काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले होते. कीर्तनानंतर भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.



दरम्यान गुरुवारी रात्री बजरंग दलाच्यावतीने श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने भव्य मिरवणुकी समोर अघोरी बाबांचे देखावे साजरे करण्यात आले होते हे देखावे पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# घनसावंगी विधानसभेतून गोविंद ढेंबरे यांना विधान परिषदेसाठी संधी द्यावी भाजप कार्यकर्त्यांचा एकमुखी ठराव

**अंबड -** केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सूचननुसार भारतीय जनता पक्षाच्या घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी एकत्र येत गोविंद नामदेव ढेंबरे यांना महाराष्ट्र विधान परिषदेसाठी आमदार म्हणून संधी द्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे. यासंदर्भात आयोजित बैठकीत सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला.



या बैठकीत ढेंबरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण आणि निष्ठावंत कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. ग्रामीण भागातील प्रश्न सोडविणे, कार्यकर्त्यांना बळ देणे आणि पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे यामध्ये त्यांचे मोठे योगदान असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यकर्त्यांनी असेही नमूद केले की, घनसावंगी विधानसभा मतदारसंघात पक्ष अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी स्थानिक व समर्पित नेतृत्वाला संधी देणे अत्यंत आवश्यक आहे. ढेंबरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

या ठरावाला सर्व कार्यकर्त्यांनी एकमताने पाठिंबा दर्शविला असून, लवकरच हा ठराव पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे पाठविण्यात येणार आहे. स्थानिक पातळीवर निर्माण झालेली ही एकजूट आणि पाठिंबा लक्षात घेता, ढेंबरे यांच्या उमेदवारीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

# जालना जिल्ह्यात उल्लास-नवभारत साक्षरता परीक्षेला २४२५ नवसाक्षरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना | प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या आदेशानुसार जालना जिल्ह्यात उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत रविवार, दि.२९ मार्च २०२६ रोजी मूलभूत साक्षरता परीक्षा () उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील एकूण ३४८ केंद्रांवर २४२५ असाक्षरांनी ही परीक्षा देऊन साक्षरतेच्या दिशेने आपले पहिले पाऊल टाकले.

१५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींमध्ये वाचन, लेखन आणि संख्याज्ञान यांसारखी मूलभूत साक्षरता विकसित करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण जिल्ह्यात परीक्षेचे उत्तम नियोजन करण्यात आले असून, वयोवृद्ध नागरिकांमध्येही शिक्षणाप्रती मोठा उत्साह यावेळी दिसून आला. या यशस्वी आयोजनामुळे जिल्ह्यातील साक्षरता अभियानाला मोठी गती मिळाली आहे. या मोहिमेत तालुकानिहाय विचार करता परतूर तालुक्यातून सर्वाधिक ६८३ आणि जालना तालुक्यातून ६११ असाक्षरांनी परीक्षेला उपस्थिती लावली. परीक्षेच्या पारदर्शक आयोजनाची पाहणी करण्यासाठी विविध पर्यवेक्षकीय यंत्रणांनी केंद्रांना भेटी दिल्या. यावेळी योजना शिक्षणाधिकारी लता सानप-मुंडे यांनी प्रत्यक्ष केंद्रांवर जाऊन परीक्षा प्रक्रियेची पाहणी केली आणि संपूर्ण नियोजनाबाबत समाधान व्यक्त केले.




### थकीत पगार व पीएफसाठी टेंभुर्णी ग्रामपंचायत कर्मचारी आक्रमक

# ५ एप्रिलपासून बेमुदत उपोषणाचा इशारा

### १४ कर्मचाऱ्यांचा एल्गार; प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र संताप

**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद** - तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांनी थकीत पगार आणि भविष्य निर्वाह निधी () न मिळाल्याने संतप्त होत प्रशासनाविरुद्ध आंदोलनाची हाक दिली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन व पीएफची देणी प्रलंबित असल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या १४ कर्मचाऱ्यांनी येत्या ५ एप्रिल २०२६ पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

**वारंवार पाठपुरावा; तरीही कार्यवाही शून्य**

कर्मचाऱ्यांनी यापूर्वी ११ मार्च आणि २० मार्च २०२६ रोजी प्रशासनाकडे लेखी निवेदने सादर करून थकीत पगार व पीएफ तातडीने अदा करण्याची मागणी केली होती. मात्र, या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

''अनेक वेळा पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नाही. त्यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही,'' असा संतप्त सूर कर्मचाऱ्यांकडून उमटत आहे.

**उपासमारीची वेळ; कुटुंबांवर आर्थिक संकट**

दीर्घकाळ पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले असून, काही कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचीही माहिती समोर येत आहे.

अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

**कामबंद आंदोलनानंतर उपोषण**

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, येत्या ७ ते ८ दिवसांत देणी अदा न झाल्यास सर्व कर्मचारी काम बंद आंदोलन छेडणार असून, त्यानंतर ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ग्रामसंसद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

**प्रशासनाला निवेदन;**



**अधिकाऱ्यांना माहिती**

या आंदोलनाबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. जालना), तहसीलदार (जाफ्राबाद), गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि वैद्यकीय अधिकारी यांना पाठवण्यात आले आहे. संभाव्य आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**या कर्मचाऱ्यांचा सहभाग**

या आंदोलनात विक्रम उकांडे, अजीस शेख करीम, दिगंबर भिसे, बाबू साबळे, कोकीलाबाई भाले, शंकर आढावे, योगेश गायमुखे, रामदास धनवई, कपिल माने, अनिल गायकवाड, अनिस बागवान, ज्ञानेश्वर शेडगे, सुभाष घोडे आणि बाबासाहेब जमधडे यांचा समावेश आहे.

**ग्रामस्थांकडूनही पाठिंबा**

कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांना ग्रामस्थांकडूनही पाठिंबा मिळत असून, ''प्रशासनाने आता तरी या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन थकीत देणी तातडीने अदा करावीत,'' अशी मागणी होत आहे.

निर्णयक टप्प्याकडे वाटचाल टेंभुर्णी ग्रामपंचायतीतील हा वाद आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

## निपुण महाराष्ट्र ही केवळ योजना नव्हे तर आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मजबूत पाया - आमदार बबनराव लोणीकर

### जालना जिल्ह्यात निपुण महाराष्ट्र उपक्रमाला गती, शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा

**जालना । प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासनाच्या ''निपुण महाराष्ट्र'' या महत्त्वाकांक्षी शैक्षणिक उपक्रमामुळे प्राथमिक शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडताना दिसत असून, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया अधिक मजबूत होत आहे. इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचन, लेखन व गणितातील मूलभूत कौशल्ये आत्मसात करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारी ही योजना ग्रामीण ते शहरी सर्व स्तरांवर प्रभावी ठरत आहे. निपुण महाराष्ट्र ही केवळ योजना नाही, तर आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मजबूत पाया आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

''पाया मजबूत तर शिक्षण मजबूत'' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरणारा उपक्रम ''निपुण महाराष्ट्र'' ही संकल्पना केंद्र शासनाच्या निपुण भारत मिशन या उपक्रमावर आधारित असून, प्रत्येक विद्यार्थी तिसरीपर्यंत ''निपुण'' व्हावा हा यामागील मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना स्पष्ट वाचन, समजून वाचन आणि मूलभूत गणित कौशल्ये अवगत करून देणे यावर या योजनेचा भर आहे, असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

जालना जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी आणि लोणीकरांची अपेक्षा

''निपुण महाराष्ट्र'' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या मूल्यांकनात जालना जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली असून, परतूर तालुक्याने ९६.९९% नोंदणीसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. भोकरदन (९२.३०%) व घनसावंगी (९२.०५%) तालुक्यांनीही उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. इतर तालुक्यांनीही समाधानकारक प्रगती साधली असून, जिल्ह्यातील एकूण शैक्षणिक स्तर उंचावल्याचे स्पष्ट झाले आहे, यात उत्तर वाढ व्हावी अशी अपेक्षा आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाचा सहभाग, समन्वय आणि परिश्रम यासाठी महत्त्वाचे ठरले असून शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, साधन व्यक्ती तसेच विशेष शिक्षक यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम करत विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवले आहे अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रत्यक्ष काम करणाऱ्या टीमचे कौतुक केले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी या संपूर्ण उपक्रमावर विशेष लक्ष असून, त्यांनी वेळोवेळी आढावा बैठकांद्वारे कामाची प्रगती व शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाला प्रोत्साहन देत या उपक्रमाला गती दिली आहे. गुणवत्ता वाढीसाठी आधुनिक पद्धतींचा वापर करण्यात आला असून या उपक्रमांतर्गत कृतीयुक्त शिक्षण, डिजिटल साधनांचा वापर, नियमित मूल्यमापन आणि शिक्षक प्रशिक्षण यावर विशेष भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांना खेळातून शिकवणे या पद्धतीमुळे शिक्षण अधिक रंजक व प्रभावी झाले असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

''निपुण महाराष्ट्र'' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढत असून, पुढील शिक्षणासाठी मजबूत पाया तयार होत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवण्याचा शासनाचा प्रयत्न असून भक्कम भविष्यासाठी मजबूत पाया घडविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

शिक्षण विभागाला मिळालेले प्रेरणादायी यश; इतरांसाठी आदर्श- लोणीकर

जालना जिल्ह्याने या उपक्रमात मिळवलेले यश हे इतर जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक ठरत असून, सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास शैक्षणिक क्षेत्रात मोठा बदल घडवता येतो, याचा हा उत्तम नमुना आहे. ''निपुण महाराष्ट्र'' ही केवळ योजना नसून, पुढील पिढी सक्षम, सुशिक्षित आणि आत्मनिर्भर बनवण्याचा एक व्यापक प्रयत्न ठरणार असल्याचे देखील आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

---

## जालना शहरात पाम सण्डे निमित्त प्रभात फेरी उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात ख्रिश्चन समाज बांधवांनी पाम सण्डे (झावळ्यांचा रविवार) उत्साहात साजरा केला. प्रभू येशू ख्रिस्त यांच्या यरुशलेममध्ये झालेल्या विजयी प्रवेशाच्या घटनेच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. झावळ्यांच्या रविवार निमित्त सकाळी ७ वाजेपासून जालना शहरातील विविध ठिकाणी प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या होत्या.

मिशन हॉस्पिटल परिसरातील क्राईस्ट चर्च कॅथेड्रल, जुना जालना भागातील नुतन वसाहत येथील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च व जालना जिल्ह्यातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळीच प्रभात फेरीमध्ये लहान मुलांनी, महिलांनी, युवक-युवतींनी हातात फुलांनी सजलेल्या खजुरीच्या झाडाच्या लहान फांद्या म्हणजेच झावळ्या हातात घेवून प्रभात फेरी काढली यावेळी ''होसान्ना, होसान्ना प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादीत असो'', अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी लहान मुलांनी लेझीम सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. चर्च परिसर खजुरीच्या झावळ्यांनी व फुलांनी आकर्षकरित्या सजविण्यात आला होता. यावेळी भक्तांनी हातात झावळ्या घेऊन येरुशलेम मधील प्रभू येशूचे जे स्वागत स्वागत करण्यात आले होते त्या घटनेच्या स्मरणार्थ घोषणा देत भव्य अशा मिरवणुका काढल्या होत्या. नुतन वसाहत येथे टॉम डॉप्सन मेमारियल चर्चचे रेव्ह.बिबीशन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळीच प्रभात फेरी काढण्यात आली होती यावेळी जार्ज उगले व टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च तरुण मंडळाच्या परिश्रमामुळे नुतन वसाहत येथील प्रभात फ ेरी यशस्वीरित्या संपन्न झाली. या उत्सवाच्या निमित्ताने श्रद्धाळूंनी प्रार्थना करत शांतता, प्रेम आणि बंधुभावाचा संदेश दिला.

---

## गोळीचं उत्तर गोळीनेच मिळणार - शाह

**नवी दिल्ली -** ''हे नरेंद्र मोदींचे सरकार आहे. जो कोणी शस्त्र उचलेल, त्याला परिणामांना सामोरे जावे लागेल. गोळीचे उत्तर गोळीनेच मिळणार'', असे गृहमंत्री अमित शाह लोकसभेत नक्षलवादावर बोलताना म्हणाले. ''चर्चा करण्यासाठी तयार असणाऱ्यांबरोबर चर्चा करायला हवी आणि जे गोळीची भाषा करतील त्यांना गोळीच मारायला हवी'', असे परखड मत शाह यांनी मांडले. ७० वर्षांपैकी ६० वर्षे काँग्रेसने राज्य केले. मग विकास का झाला नाही? तुम्ही विकास का केला नाही? असा सवालही शाह यांनी यावेळी उपस्थित केला.

बस्तरमधून नक्षलवाद हद्दपार अमित शाह अमित शाह लोकसभेत नक्षलवादावर बोलत आहेत. या चर्चेबद्दल रेड कॉरिडॉरमधील १२ राज्ये आणि आदिवासी समुदायांच्या वतीने शाह यांनी आभार मानले.

''बस्तरमधून नक्षलवाद आता जवळजवळ संपुष्टात आला आहे. बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा बांधण्याची मोहीम सुरू करण्यात आली. बस्तरमधील प्रत्येक गावात शिधावाटपाची दुकाने उघडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहेत'', असे शाह म्हणाले. ''नक्षलवादाचे मूळ कारण विकासाची मागणी नसून एक विचारसरणी असून, इंदिरा गांधींनी राष्ट्रपती निवडणुकीमुळे ती स्वीकारली होती'', असे शब्दात त्यांनी काँग्रेसवर टीका केली. अमित शाह यांनी यावेळी ऑपरेशन बुद्धा, ऑपरेशन थंडरस्टॉर्म आणि ऑपरेशन भीमबांधा यांचा उल्लेख केला.

---

## स्व.शब्बीर अंसारी यांना धार्मिक पातळीवर विरोध असतांनाही मुस्लिम ओबीसींना न्याय मिळवून दिला

### सर्वपक्षीय शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम ओबीसी समाजाला त्यांच्या हक्कांसाठी अनेक वर्षे लढा देणारे ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष स्व. शब्बीर अहमद अन्सारी यांच्या कार्याला समाजात मोठे महत्त्व होते. अनेक अडचणी आणि विरोधाचा सामना करत असतानाही त्यांनी कधीही मागे हटणे स्वीकारले नाही. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे केंद्र व राज्य शासनाकडून मुस्लिम ओबीसी समाजाला हक्क मिळवून देण्यात यश आले आणि एक सामाजिक क्रांती घडून आली.

स्व. अन्सारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना नेते भास्कर अंबेकर यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, स्व. अन्सारी यांचे नेतृत्व ओबीसी समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी होते. उपमहापौर राजेश राऊत यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, स्व. शब्बीर अन्सारी हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून देशातील एक क्रांतिकारी नेते होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य फुले, शाहू ,आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांच्या प्रसारासाठी समर्पित केले. वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे कार्य जनता कधीही विसरणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. डॉ. संजय राख यांनी सांगितले की, शब्बीर अंसारी यांनी शेवटच्या श्वासापर्यंत ओबीसी समाजासाठी कार्य केले. त्यांचे राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांशी जवळचे संबंध होते; मात्र त्यांनी कधीही स्वतःसाठी काहीही मागितले नाही. त्यांचा निःस्वार्थ स्वभाव सर्वांसाठी आदर्श होता.

ज्येष्ठ नेते इक्बाल पाशा यांनी सांगितले की, शब्बीर अंसारी हे माझे अत्यंत जवळचे मित्र होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून ओबीसी समाजाची चळवळ उभी केली. आज देशपातळीवर त्यांचे नाव आदराने घेतले जाते. मुस्लिम ओबीसी समाजासाठी त्यांनी केलेले कार्य आम्ही कधीही विसरू शकत नाही.

एक निःस्वार्थ, ध्येयवेडा आणि कुशल संघटक आपल्यातून कायमचा निघून गेला आहे. मात्र त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.यावेळी ज्येष्ठ पत्रकार अंकुश देशमुख, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेद्र राख, अब्दुल हफीज, राष्ट्रवादी शहर काँग्रेस जिल्हा अध्यक्ष शेख मेहमूद,वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष डेव्हिड घुमारे , मराठा महासंघाचे अरविंद देशमुख, बाराबलुतेदार महासंघाचे अध्यक्ष कल्यानराव दळे, जमाते इस्लामी हिंदचे अब्दुल मुजीब शहर काँग्रेसचे अध्यक्ष अतिक खान काँ. सगीर अहेमद रिझवी, पार्टीचे फिरोज बागवान, कुणबी सेनेचे विष्णू कदम, शकील खान, सामाजिक कार्यकर्ते मोहन इंगळे, आदींनी श्रद्धांजली पर बोलताना स्व. शब्बीर अंसारी यांच्या जिवन आणि त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करून आपल्या भाषणातून श्रद्धांजली अर्पित केली.

स्व. शब्बीर अंसारी यांचे पुत्र इलियास



छाया/जावेद तंबोली

अंसारी, गुफरान अंसारी, एजास अंसारी यांची यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सत्संग मुंढे यांनी करून स्व. शब्बीर अंसारी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून ओबीसीचा लढा उभारून अथक परिश्रमातून देशपातळीवर ओबीसी समजात जागरूकता निर्माण केली असे सांगून त्यांच्या संपूर्ण कार्याबद्दल माहिती दिली.

याप्रसंगी संजय इंगळे, गणेश सुपारकर, सतीश वाहुळे , कलीम खान, शिवराज जाधव, शफी मुसा,नगरसेवक आमेर खान, आसेफ अंसारी, सय्यद रहीम, इम्रान खान, राजेश ओ राऊत, अविनाश चव्हाण, कार्य अध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, अहेमद नूर कुरेशी, शिवसेनेचे दिनकर घेवंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र जाधव, बसपाचे किशोर बोर्डे, माजी जि.प.सदस्य राम सावंत, आप सुरेश कांबळे, रमेश मुळे, शेख शकील, शेख वसीम,विजय सोनवणे, अजीम बागवान, गप्फार बेग, जावेद अली, संतोष निकाळजे आदि विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.